**MHKO020036382022**

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४४३/२०२२ मधील निशाणी १३ वरील आदेश</u>.**

प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी त्यांच्या विरुध्द विना म्हणणे झालेला हुकूम रद्द होवून म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

२. प्रस्तुत वि.प. यांनी म्हणणे देणेस जाणुनबुजून विलंब केलेला नाही. वि.प. यांचे वडिलांना उच्च रक्तदाबाचा त्रास असल्याने अचानकपणे जानेवारी महिन्यामध्ये झटका आल्याने त्यांची ॲजिओप्लास्टी झाली. त्यामुळे त्यांना औषधपाणी, नियमीत आहार व उपचाराकरीता वेळोवेळी डॉक्टरांकडे वि.प. यांना घेऊन जावे लागत होते. त्यामुळे वि.प. यांना मुदतीत त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता आवश्यक असणा–या कागदपत्रांची जुळवाजुळव करता आली नाही व शासकीय कार्यालयातून महत्वाची कागदपत्रे मिळवता आली नसल्यामुळे न्यायालयात हजर राहून मुदतीत म्हणणे देता आले नाही. तसेच सदर कामाचा वाद विषय हा स्थावर मिळकतीचे मालकीबाबत असून अर्जदारांनी वारसाने हक्क दाखवलेला आहे. तथापि, मयत कृष्णा चंदू शिंदे यांनी वि.प. यांचे नावे करुन ठेवलेल्या मृत्यूपत्रान्वये वि.प. हे मिळकतीचे मालक झालेले असल्यामुळे अर्जदार व वि.प. यांच्यामधील वादाची उकल होण्यासाठी वि.प. यांचे म्हणणे याकामी सामील करुन घेणे आवश्यक आहे. सदर अर्जातील विषय हा स्थावर मिळकतीबाबत असून म्हणणे दाखल करुन न घेतलेस वि.प. यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. याउलट अर्जदार यांचे काहीही नुकसान होणार नाही. प्रस्तुत काम गुणदोषावर चालून न्यायनिर्णय होणेस

मदतच होणार आहे. सबब, वि.प. यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन दाखल केलेले म्हणणे कामात सामिल करुन घेण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला आहे. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे, वि.प. यांचे अर्जातील कथन चुकीचे व बेकायदेशीर असून त्याला कोणताही कायदेशीर आधार नाही. वि.प. यांना दिनांक १८/०१/२०२३ रोजी नोटीस लागू झाली. असे असताना वि.प. यांना पुरेसा वेळ व संधी देवूनही वेळेत म्हणणे दिलेले नाही. तसेच वि.प. हे वकिलामार्फत हजर झाले असून मुदत अर्जही दिलेले आहेत. सदर मुदत अर्जामध्ये वि.प.चे वडिलांचे ऑपरेशनबाबतचा उल्लेख नाही.

४. पुढे अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदारचे वडीलांच्या अखेरपर्यंत अर्जदार त्यांची सेवासुश्रूषा करत होत्या. त्यावेळी तिचे वडीलांनी बँक व्यवहार व त्यांच्या सर्व मिळकतींची माहिती अर्जदार यांना दिलेली होती. तसेच त्यांच्या सर्व बँकेतील पैसे व स्थावर जंगम सर्व मिळकती अर्जदार यांनी मालकीहक्काने उपभोगाव्यात असे स्पष्टपणे सांगितले होते. तथापि, वि.प.चे मृत्यूपत्राबाबतचे कथन पूर्णपणे खोटे आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. दोन्ही बाजूच्या विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, वि.प. हे अर्जात हजर झाले. परंतु, वि.प. यांचे वडील आजारी असल्यामुळे व त्यांची ॲजिओप्लास्टी झालेने वि.प. यांना त्यांच्या वडिलांसोबत वारंवार जावे लागत असल्यामुळे म्हणणे मांडणेसाठी आवश्यक असणारी माहिती व कागदपत्रे वेळेवर उपलब्ध न झालेने वि.प.ना मुदतीत म्हणणे देता आले नाही, हे त्यांचे शपथेवरील कथन संयुक्तीक वाटते. प्रस्तुत अर्ज हा भारतीय

वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरीता दाखल केला असून अर्जदार मागणी करत असलेल्या ठेवपावतीवर नॉमिनी म्हणून वि.प. यांचे नाव लावलेचे अर्जदार यांना बँकेकडून समजलेने त्यांना याकामी पक्षकार केले आहे. त्यामुळे, प्रस्तुत वि.प. यांना त्यांचा बचाव मांडण्याची संधी मिळणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच, अर्ज गुणदोषावर चालवून अर्जदार–वि.प. मधील सर्व वादप्रश्न निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत वि.प. यांना निश्चितच म्हणणे दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून म्हणणे नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे म्हणणे दाखल करुन घेतल्यास अर्जदारचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास वि.प.ना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही. परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. असे असताना, म्हणणे दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वि.प. वर खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: **आदेश** ::

वि.प. यांचेवर रक्कम रुपये ५००/– खर्च आकारुन अर्ज (निशाणी १३) मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by Vibha Prakash Gaikwad
Date: 2023.09.08 18:22:38 +0530

कोल्हापूर (विभा प्र. गायकवाड)

दि.०८/०९/२०२३ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कोल्हापूर